**महत्वाचे /कालमर्यादा**

**सहायक जन माहिती अधिकारी/जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची माहिती शासनाच्या संगणकीय संकेतस्थळी (वेबसाईट) इंग्रजी भाषेतसुध्दा प्रसिध्द करणे -----------**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक केमाअ-२००६/प्र.क्र.१/०६/पाच,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३.२.२००६

पहा:- १) क्रमांक: केंमाअ-२००५/प्र.क्र.१९०/०५/५,दिनांक:- १८/६/२००५,
२) क्रमांक: केंमाअ-२००५/प्र.क्र.१९०/०५/५,दिनांक:- ६/८/२००५,
३) क्रमांक: केंमाअ-२००५/प्र.क्र.२३०/०५/५,दिनांक:- १८/८/२००५,
४) क्रमांक: केंमाअ-२००५/प्र.क्र.२९३/०५/५,दिनांक:-६/९/२००५.

**शासन परिपत्रक :-**

केंद्र शासनाच्या माहिती अधिकार अधिनियिम, २००५ मधील तरतुदींच्या अनुषंगाने 'सहायक जन माहिती अधिकारी'/'जन माहिती अधिकारी' व 'अपिलीय प्राधिकारी' यांच्या नियुक्त्यांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करुन तत्संबंधीची माहिती शासनाच्या संगणकीय संकेतस्थळी प्रसिध्द करण्याच्या सूचना यापूर्वीच उपरोक्त परिपत्रकांद्वारे सर्व संबंधितांना दिलेल्या आहेत. वरील सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही आतापर्यंत निश्चितच पूर्ण झालेली असणे अपेक्षित आहे. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालये/ प्राधिकरणे/महामंडळे इ. मध्ये ज्या ज्या ठिकाणी 'सहायक जन माहिती अधिकारी', 'जन माहिती अधिकारी' आणि 'अपिलीय प्राधिकारी' यांच्या नियुक्त्या करणे सदर अधिनियमानुसार आवश्यक आहे अशा सर्व ठिकाणी उक्त नियुक्त्या अद्याप झाल्या नसतील तर त्या विनाविलंब करण्यात याव्यात

२. राज्यातील बहुभाषिक नागरिकांच्या सोयीकरिता 'सहायक जन माहिती अधिकारी'/ 'जन माहिती अधिकारी' आणि 'अपिलीय प्राधिकारी' यांच्या नियुक्त्यांबाबतची माहिती मराठी भाषे प्रमाणेच इंग्रजी भाषेतही उपलब्ध असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता या नियुक्त्यांच्या सदर्भातील सर्व माहिती मराठी भाषेप्रमाणेच इंग्रजी भाषेतूनही विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी. ही कार्यवाही राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर प्राधम्याने पूर्ण करण्यात यावी. ज्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील तालुकास्तर व त्याखालील स्तरावरील क्षेत्रीय कार्यालयात जर संगणकीय यंत्रणा उपलब्ध नसेल तर अशा कार्यालयांची सर्व माहिती त्यांच्या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती वेबसाईटवर मराठी भाषेसह इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करण्याची व ती अद्ययावत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी सर्व मंत्रालयीन विभागांची राहील. माहिती अधिकारा अंतर्गत जी माहिती प्रसिद्ध करावयाची आहे ती माहिती संबंधित विभागाच्या वेबसाईटवर त्यांच्या वेब-कोऑर्डिनेटरमार्फत प्रसिद्ध करावी व या करिता सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांनी सर्व विभागाच्या वेब-कोऑर्डिनेटर्सना मार्गदर्शन करावे अशा सूचना यापूर्वीच दि.१८.८.२००५ च्या परिपत्रकान्वये देण्यात

आलेल्या आहेत. या सूचना विचारात घेवून आवश्यक माहिती लवकरात लवकर वेब साईटवर प्रसिद्ध करण्याची कार्यवाही वेब-कोऑर्डीनेटरमार्फत पूर्ण करावी.

३. वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादीसह एकत्रित माहितीच्या दोन प्रतीत आणि फ्लॉपीसह या विभागाकडे, राज्य माहिती आयोगाकडे तसेच सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांचेकडे सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( रा.मे.प्रेमकुमार )
शासनाचे मुख्य सचिव

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
७)*प्रबंधक,उच्च न्यायालय, मूळ शाखा मुंबई,
८)*प्रबंधक,उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
९)*प्रबंधक, महराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१०)*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त, मुंबई,
११)* सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई,
१२)* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३)* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) सर्व मंत्रालयीन विभाग,तसेच सर्व मंत्रालयीन विभागांचे वेब कॉर्डीनेटर
१७) मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख,
१८) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१९) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२०) निवड नस्ती.

* पत्राने.